जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४४६ दिनांक -२०/०६/२०२३

### वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

# गाड्यांची तोडफोड करणारा सराईत गुन्हेगार पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे,व त्याचे साथीदार यांचेवर मकोका कारवाई

वारजे माळवाडी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/०५/२०२३ रोजी स्वरा हाईट्स,न्यु अहिरे गांव,गणपती माथा,वारजे माळवाडी,पुणे या इमारतीच्या टेरेसवर फिर्यादीचा भाचा यास त्या भागातील गुन्हेगार पपुल्या याचे सांगण्यावरून त्याचे साथीदार बाब्या व मारत्या यांनी कर्वेनगर येथून जबरदस्तीने पकडून स्वरा हाईट्स,न्यु अहिरे गांव,गणपती माथा,वारजे माळवाडी,पुणे या इमारतीच्या टेरेसवर नेवून पपुल्या याने फिर्यादी याच्या भाच्या सोबत झालेल्या पुर्वीच्या भांडणा वरून पपुल्या व त्याचे साथीदार साई ढमाले,राहूल वांजळे,मारत्या,नंद्या व बाब्या अशांनी फिर्यादीचे भाच्याला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,गंभीर जखमी केल्या म्हणून त्यांचेविरूध्द फिर्यादीने तक्रार दिल्याने वारजे माळवाडी पो.स्टे २०६/२०२३,भादंवि कलम ३६४,३०७,१४३,१४७,१४९ सह मपोअधि कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान सदर गुन्हा हा **१) पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे,वय १९ वर्षे,रा.दत्तनगर,सुभाष बराटे चाळ,रामनगर,वारजे माळवाडी,पुणे (टोळी प्रमुख) २) राहुल विठ्ठल वांजळे,वय २४ वर्षे,रा.फ्लॅट नंबर १०१,स्वरा हाईट्स,कमानीजवळ,न्यु- अहिरेगाव पुणे (टोळी सदस्य) ३) मारोती ऊर्फ मारत्या पांडुरंग टोकलवाड,वय १९ वर्षे, रा.विश्वास खंडाळे यांचे चाळीत,लाकडाच्या वखारी जवळ, कॅनॉल रोड,वारजे पुणे (टोळी सदस्य) ४) हर्षद ऊर्फ बाब्या संतोष वांजवडे,वय १९ वर्षे,रा.कोळीवाडा,भारत निवास बिल्डींग शेजारी,शिवराय मित्र मंडळा जवळ,वारजे गावठाण,वारजे,पुणे** ५) नंद्या (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही व १ विधि संघर्षित बालक यांनी केला असल्याचे तपासामध्ये निष्पन्न केले असून ०४ आरोपींना अटक करण्यात आलेली असुन विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेवुन पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

अटक आरोपी यांचेकडे सखोल तपास केला असता आरोपी नामे **१) पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे, वय १९ वर्षे, रा. दत्तनगर, सुभाष बराटे चाळ, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे (टोळी प्रमुख)** हा प्रत्येक गुन्हयामध्ये गुन्हयामध्ये काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने दाखल गुन्हयात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव श्री.डी.एस.हाके,तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे यांनी मा.श्री सुहेल शर्मा,पोलीस उप आयुक्त,परि-३ पुणे शहर यांचे मार्फतीने मा.श्री प्रविणकुमार पाटील साहेब,अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे यांना सादर केलेला होता.

सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर आरोपी नामे **१) पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे, वय १९ वर्षे, रा. दत्तनगर, सुभाष बराटे चाळ, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे (टोळी प्रमुख)** याने आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयामध्ये काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी नामे **१) पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे, वय १९ वर्षे, रा. दत्तनगर, सुभाष बराटे चाळ, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे (टोळी प्रमुख)** याने आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून स्वतःची संघटीत टोळी तयार करून अपराध केलेले असून यातील आरोपी यांनी **जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, खाजगी मालमत्तेचे नुकसान करणे, बेकायदेशीर जमाव जमविणे, धमकी देणे, बेकायदेशिर अग्नी शस्त्र जवळ बाळगणे, बेकायदेशिर शस्त्र जवळ बाळगणे, पोलीसांच्या आदेशाचा भंग करणे, जनतेच्या मनात दहशत निर्माण करणे,शासकिय कामात अडथळा निर्माण करणे** यासारखे गंभीर गुन्हे वारंवार केले असल्याने दाखल गुन्हयामध्ये **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (।।), ३ (४)** या कलमाचा समावेश करणे बाबत श्री प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास **श्री.भिमराव टेळे,सहा पोलीस आयुक्त,कोथरूड विभाग पुणे शहर हे करीत आहेत.**

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर, श्री. संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. प्रविणकुमार पाटील साहेब,मा.पोलीस उप आयुक्त परि-३, पुणे शहर, श्री सुहेल शर्मा, मा.सहा. पोलीस आयुक्त, कोथरूड विभाग, पुणे शहर, श्री भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे तात्कलीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.हाके,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.दत्ताराम बागवे,निगराणी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक यशवंत पडवळे,पोलीस अंमलदार सचिन कुदळे,अमोल भिसे,विजय खिलारी,नितीन कातुर्डे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही २८ वी कारवाई आहे.**